
तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २९ जानेवारी २०२५

आतील पानावर
पान २– पंचायत ४'मध्ये होणार बिगबींची एन्ट्री?
पान ३– दिग्गज अभिनेत्रीची नात, एका गाण्याने...
पान ४– समांथा रुथ प्रभूची तमीळ चित्रपटांकडे पाठ?
पान ५– क्रिकेटरच्या मराठमोळ्या पत्नीचे...
पान ६– रणबीर कपूर 'धूम ४'मध्ये खलनायक तर...





# सिद्धार्थ आणि जान्हवीच्या 'परम सुंदरी'चे शूटिंग सुरू

सिद्धार्थ मल्होत्रा आणि जान्हवी कपूर यांनी नुकताच त्यांचा पुढचा चित्रपट 'परम सुंदरी' ची घोषणा केली आहे. त्याचे मोशन पोस्टरही प्रदर्शित झाले आहे आणि त्यामुळे चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. सिद्धार्थने अखेर केरळमध्ये चित्रपटाचे चित्रीकरण सुरू केले आहे आणि त्याने एक फोटोही शेअर केला आहे. सिद्धार्थ मल्होत्राने केरळमध्ये 'परम सुंदरी' चित्रपटाचे चित्रीकरण सुरू केले आहे. या अभिनेत्याने सेटवरील एक अद्भुत व्हिडिओ शेअर केला आहे. पहिल्या दिवशी, त्याला बॅकवॉटरचे सर्वोत्तम दृश्य पाहण्याची संधी मिळाली. केरळमधील बॅकवॉटरमध्ये या अभिनेत्याने चित्रीकरण सुरू केले. त्याने हे दृश्य इंस्टाग्राम स्टोरीवर शेअर केले आहे आणि ते खरोखरच आश्चर्यकारक आहे. हा फोटो शेअर करताना सिद्धार्थ मल्होत्राने कॅप्शनमध्ये लिहिले, 'नमस्कारम केरळ'. तुषार जलोटा दिग्दर्शित आणि दिनेश विजनच्या मॅडॉक फिल्म्स निर्मित, परम सुंदरी ही एक प्रेमकथा आहे. ही कथा एका उत्तर भारतीय पुरूषाच्या दक्षिण भारतीय महिलेच्या प्रेमात पडण्याची आहे. ही कथा केरळमध्ये घडते आणि त्यामुळे चित्रपटाचे चित्रीकरणही तिथे सुरू झाले आहे. परम सुंदरीमध्ये रोमान्ससोबतच विनोदाचाही डोस असेल. याआधीच्या मोशन पोस्टरमध्ये सिद्धार्थ उत्तर भारतीय मुलाच्या भूमिकेत होता आणि जान्हवी दक्षिण भारतीय पोशाखात होती. पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिले होते, 'उत्तरेचा स्वॅग, दक्षिणेचा अभिमान- दोन जग एकमेकांशी टक्कर घेतात आणि ठिणग्या उडतात.' दिनेश विजन सादर करतात परम सुंदरी. तुषार जलोटा दिग्दर्शित एक प्रेमकथा, २५ जुलै रोजी थिएटरमध्ये दाखल होत आहे. परमच्या भूमिकेत सिद्धार्थ मल्होत्रा आणि सुंदरीच्या भूमिकेत जान्हवी कपूर येणार आहे.

# पंचायत ४'मध्ये होणार बिगबींची एन्ट्री?



'पंचायत' वेबसीरिज अनेकांच्या पसंतीस पडली. 'पंचायत'चे तीनही सीझन चांगलेच गाजले. यातील कथा आणि कलाकारांच्या अभिनयाचे सर्वांकडून कौतुक झाले. यानंतर आता 'पंचायत ४' ची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. सध्या याचे शूटींग सुरू असून नुकताच सेटवरील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

फुलेरा गावातील ग्रामपंचायत कार्यालयातून तर दुसरा आमदारांच्या घरातील हे व्हिडिओ आहेत. ज्यात बॉलिवूड मेगास्टार अमिताभ बच्चन फुलेरा गावात दिसत आहेत. यानंतर आता पंचायतच्या पुढच्या सीझनमध्ये बिग बींनी कॅमिओमध्ये दिसणार अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. खरं तर, अमिताभ बच्चन हे सायबर जनजागृतीविषयी भारत सरकारच्या एका जाहिरातीसाठी 'पंचायत ४' च्या सेटवर गेले होते. तिथे त्यांनी 'पंचायत'मध्ये विधायकाची भूमिका साकारणारे पंकज झा आणि विकाससोबत शूटिंग केलं. याशिवाय इतर कलाकारांची भेट घेऊन त्यांच्यासोबत संवाद साधला. हे व्हिडिओ शेअर करत अमिताभ बच्चन यांनी लिहिले की, 'सावध रहा, सतर्क रहा. नेहमी फक्त एसइबीआय मंजूर ॲप वापरा. मदतीसाठी सायबर मित्रला १९३० वर कॉल करा.' फसवणूकीपासून सावध राहण्यासाठी जनजागृती केली आहे.


दरम्यान, 'पंचायत ४' वेबसीरिजचं सध्या शूटिंग सुरु असून ही सीरिज पुढील वर्षी २०२६ मध्ये भेटीला येण्याची शक्यता आहे. अमिताभ यांच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, ते शेवटचे कल्की २९९८ AD या चित्रपटात दिसले होते. या चित्रपटाचे दिग्दर्शन नाग अश्विन यांनी केले होते. या चित्रपटात दीपिका पदुकोण, प्रभास आणि कमल हसनसारखे स्टार्स होते.

# बिग बजेट चित्रपटात दीपिका महत्त्वाच्या भूमिकेत



बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोणने मागच्या वर्षी बाळाला जन्म दिला होता. बाळाच्या जन्मानंतर दीपिकाने कामापासून ब्रेक घेतला होता. मात्र, आता मॅटरनिटी ब्रेकनंतर दीपिका लवकरच शूटिंगला सुरुवात करणार आहे. ती लवकरच 'कल्की २८९८ एडी पार्ट २'च्या शूटिंगला सुरुवात करणार आहे. वर्ष २०२४ मध्ये दीपिकाचे 'कल्की २८९८ एडी' आणि 'सिंघम अगेन' हे दोन चित्रपट रीलिज झाले होते. नुकतेच, दीपिकाने वाढदिवसानिमित्त 'कल्की २८९८ एडी'च्या निर्मात्यांकडून सोशल मीडियाच्या माध्यमातून तिला शुभेच्छा देण्यात आल्या. दीपिकाचा चित्रपटाच्या शूटिंगचा व्हीडिओ देखील शेअर करण्यात आला होता. तेव्हापासून दीपिका लवकरच चित्रपटाच्या दुसऱ्या भागाचे शूटिंग करण्यासाठी सेटवर परतणार असल्याच्या चर्चा आहेत. दीपिका 'कल्की २८९८ एडी'च्या दुसऱ्या भागाचे शूटिंग कधी सुरू करणार याबाबतची तारीख समोर आलेली नाही. या चित्रपटात तिने सुमतीची भूमिका साकारली आहे. त्यामुळे दुसऱ्या भागात देखील तिची भूमिका असेल. 'कल्की २८९८ एडी- २' मध्ये दीपिकासोबतच प्रभास, अमिताभ बच्चन आणि कमल हसन देखील प्रमुख भूमिकेत दिसतील. दिग्दर्शन नाग अश्विन हे करत आहेत. चित्रपटाच्या या भागाचे ३५ टक्के शूटिंगही पूर्ण झाले आहे.

# सलमान खानच्या 'सिकंदर'चा मुहुर्त टळणार?




बॉलिवूड अभिनेता सलमान खानचा 'सिकंदर' हा चित्रपट यावर्षी ईदला प्रदर्शित होणार असल्याचे म्हटले जात आहे. त्याच्या या चित्रपटाबाबत सर्वांच खूप उत्सुक लागली आहे. 'सिकंदर' सिनेमा ईदच्या मुहुर्तावर रिलीज होणार हे आधीपासूनच ठरलेल होतं. परंतु 'सिकंदर'चा ईदचा रिलीज डेटचा मुहुर्त टळणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही. काही दिवसांपूर्वी रश्मिका मंदान्ना जखमी झाली आहे आणि त्यामुळे शूटिंग रद्द करण्यात आले. रश्मिका मंदानाने एक पोस्ट शेअर केली होती. ज्यात तिने सांगितले होते की, तिला जिममध्ये दुखापत झाली. ती पुढील काही आठवडे आणि महिने विश्रांती घेत आहे. पण रश्मिका लवकरच थमा आणि सिकंदरच्या सेटवर परतणार आहे. ईद मार्चमध्येच असल्याने चित्रपटाची अनेक मोठी कामे अजून बाकी आहेत. जर रश्मिका मंदानाचा भाग वेळेवर चित्रित झाला नाही तर चित्रपटाच्या प्रदर्शनाला विलंब होऊ शकतो. नुकताच तिचा एक विमानतळावरील व्हिडिओ व्हायरल झाला होता. ज्यात तिच्या पायाला दुखापत झाल्याचे दिसत आहे. यावेळी ती व्हिलचेअरचा आधार घेताना दिसली होती. अशा परिस्थितीत ती शूटिंग पूर्ण करू शकणार का? असा उपस्थित केला जात आहे. साजिद नाडियादवाला निर्मिता ए. आर. मुरुगोदास दिग्दर्शित 'सिकंदर' सिनेमात सलमान खान प्रमुख भूमिकेत आहे. तर त्याच्यासोबत रश्मिका मंदाना झळकणार आहे.

# दिग्गज अभिनेत्रीची नात, एका गाण्याने बनली स्टार



नवदच्या दशकात एका गाण्याने ही अभिनेत्री घराघरात प्रसिद्ध झाली. तिचं चित्रपटसृष्टीतील पदार्पणही जबरदस्त होतं, पण चुकीच्या चित्रपटांची निवड केल्यामुळे तिचं करिअर संपलं. सलग १२ फ्लॉप चित्रपट दिल्यानंतर तिने लग्न केलं आणि संसारात रमली. तिचं नाव जॉन अब्राहम, युवराज सिंग, सलमान रश्दी यांच्याशी जोडलं गेलं होतं. या अभिनेत्रीची आजी दिग्गज अभिनेत्री होती. या अभिनेत्रीचा जन्म कोलकाता येथे एका राजघराण्यात झाला. तिची आजी व आई दोघाही अभिनेत्री होत्या, तर तिचे वडील राजघराण्याचे वंशज आहेत. या अभिनेत्रीचं नाव रिया सेन आहे. रियाची आई मुनमुन सेन व तिची आजी सुचित्रा दोघीही नावाजलेल्या अभिनेत्री आहेत. तिचे वडील भरत देव वर्मा हे त्रिपुराच्या राजघराण्यातील आहेत. ते कूचबिहारच्या राजकन्या इला देवी यांचे पुत्र आणि जयपूरच्या महाराणी गायत्री देवी यांचे पुतणे होते. ४५ वर्षीय रिया सेनने २० व्या वर्षी मुख्य अभिनेत्री म्हणून २००१ मध्ये 'स्टाइल' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. पण त्याआधी ती बालकलाकार म्हणून १९९१ मध्ये 'विषकन्या' या हिंदी चित्रपटात झळकली होती. या सिनेमात तिची आई मुनमुन, कबीर बेदी आणि पूजा बेदी देखील होते. 'याद पिया की आने लगी' या गाण्याने रिया सेनला लोकप्रियता मिळून दिली. ९० च्या दशकातील हे गाणं आजही ऐकायला मिळतं, इतकी त्याची क्रेझ आहे. २००६ मध्ये आलेल्या 'अपना सपना मनी मनी' या चित्रपटानंतर तिचे सलग १२ चित्रपट फ्लॉप ठरले. २०१६ मध्ये आलेल्या 'डार्क चॉकलेट' या चित्रपटातून तिने लक्ष वेधून घेतले. आता ती वेब सीरिजमध्ये काम करताना दिसते. रिया सेन आपल्या चित्रपटांपेक्षा वैयक्तिक आयुष्यामुळे जास्त चर्चेत राहिली. जॉन अब्राहम बिपाशाआधी रियाबरोबर रिलेशनशिपमध्ये होता. या दोघांना लग्न करायचं होतं, पण नंतर ते वेगळे झाले. नंतर रियाचं नाव अश्मित पटेलबरोबर जोडलं गेलं होतं. २००५ मध्ये तिचा व अश्मितचा एक एमएमएस लीक झाला होता, ज्यामुळे रिया आणि अश्मितमध्ये मतभेद झाले. रियाचे नाव बुकर प्राइज विजेते सलमान रश्दी यांच्याशी जोडले गेले, परंतु नंतर तिने या अफवा फेटाळल्या. मग तिचे नाव पुन्हा क्रिकेटपटू युवराज सिंह आणि श्रीशांतबरोबरही जोडले गेले होते. अखेर तिने २०१७ मध्ये एका खासगी समारंभात बॉयफ्रेंड शिवम तिवारीशी बंगाली रितीरिवाजानुसार लग्न केले.

# 'पुष्पा ३' साठी करावी लागणार खूप प्रतीक्षा

सुकुमार दिग्दर्शित 'पुष्पा २' हा चित्रपट चमकदार कामगिरी करत आहे. अल्लू अर्जुनच्या चित्रपटाने उत्तरेकडील भागात चांगले कलेक्शन केले आहे, त्यामुळे अभिनेत्याची लोकप्रियताही वाढत आहे. मात्र, त्याच्या यशादरम्यान हा चित्रपट वादातही सापडला. विशेषतः अभिनेता अल्लू अर्जुनला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. हैदराबादच्या संध्या थिएटर चेंगराचेंगरी प्रकरणातही त्यांना तुरुंगात जावे लागले होते. दरम्यान, दिग्दर्शक सुकुमार रजेवर आहेत. आता चित्रपटाशी संबंधित महत्त्वाचे अपडेट्स समोर येत आहेत. दिग्दर्शक सुकुमार सध्या अमेरिकेत सुट्टी घालवत आहेत. तो राम चरणसोबत त्याच्या आगामी प्रोजेक्टची तयारीही करत आहे. या चित्रपटाशी संबंधित जी महत्त्वाची माहिती समोर आली आहे ती अशी की, सुकुमारने 'पुष्पा ३' सध्या थांबवला आहे आणि सध्या तिसऱ्या हप्त्याचा विचार करत नाहीये. गेल्या दीड वर्षांपासून शूटिंग आणि रिलीज प्रक्रियेमुळे सुकुमारला खूप तणावाचा सामना करावा लागत होता. दिग्दर्शक विश्रांतीसाठी सुट्टीचा आनंद घेत आहे आणि त्याला गोष्टींमध्ये घाई करायची नाही. त्याचवेळी, ज्यांना २०२६ मध्ये 'पुष्पा ३' रिलीज होण्याची अपेक्षा आहे, त्यांना निराशेचा सामना करावा लागू शकतो, कारण २०२७ च्या आधी तो सुरू होणार नसल्याचे बोलले जात आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी कोणतीही निश्चित कालमर्यादा नाही. 'पुष्पा २' बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करत आहे. प्रदर्शित होताच या चित्रपटाने अनेक विक्रम मोडले. आता तो नवा विक्रम रचण्यापासून काही पावले दूर आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरून आतापर्यंत ११९८.१ कोटी रुपयांची कमाई केली असून लवकरच तो १२०० कोटींच्या क्लबमध्ये सामील होणार आहे. या चित्रपटाने केवळ हिंदी भाषेतून ८०० कोटी रुपयांची कमाई केली आहे.

# दिशा पटानी हॉलिवूड पदार्पणासाठी सज्ज?



अभिनेत्री दिशा पटानीने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. अभिनयासह तिच्या स्टाईलने ती सर्वांचे लक्ष वेधून घेते. बॉलीवूडमध्ये अल्पावधीतच मोठे यश मिळवल्यानंतर दिशा आता हॉलिवूड पदार्पणासाठी सज्ज झाली आहे.

सोशल मीडियावर दिशा पटानीचा एक फोटो तुफान व्हायरल होत आहे. यावरून दिशा आता हॉलिवूडमध्ये पदार्पण करणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटोमध्ये दिशा 'फास्ट अँड फ्युरियस' स्टार टायरेस गिब्सन आणि अभिनेता हॅरी गुडविन्स सोबत दिसत आहे. यावरून आता दिशाने हॉलिवूडमध्ये पहिले पाऊल टाकल्याचे म्हंटले जात आहे. मात्र, याबाबत अद्याप तिने कोणतीही अधिकृतरित्या माहिती दिलेली नाही. याशिवाय अहमद खान दिग्दर्शित बहुप्रतिक्षित 'वेलकम टू द जंगल'मध्ये दिशा पटानीही दिसणार आहे. हा चित्रपट लोकप्रिय 'वेलकम' फ्रँचायझीचा तिसरा भाग आहे आणि २०२५ मध्ये रिलीज होणार आहे. या चित्रपटाची चाहते देखील आतुरतेने वाट पाहत आहेत. दिशा पटानी शेवटची साऊथ सुपरस्टार प्रभासच्या 'कल्की २८९८ एडी'मध्ये दिसली होती. कल्कि २८९८ AD मध्ये, दिशाने अमिताभ बच्चन, दीपिका पदुकोण आणि कमल हासन यांच्यासोबत स्क्रीन शेअर केली होती. या चित्रपटाने जगभरातील बॉक्स ऑफिसवर ११०० कोटींहून अधिक कमाई केली होती.

# विजय देवरकोंडाच्या 'वीडी-१२' चे प्रदर्शन लांबणीवर

दाक्षिणात्य सुपरस्टार अभिनेता विजय देवरकोंडा अलिकडेच त्याच्या 'साहिबा' या म्युझिक व्हिडीओमुळे चांगलाच चर्चेत आला होता. आपल्या दमदार अभिनयासाठी ओळखल्या जाणाऱ्या या अभिनेत्याची जगभरात लोकप्रियता आहे. विजय देवरकोंडा कायमच त्याच्या अभिनयासह वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत येत असतो. सध्या अभिनेता त्याचा आगामी चित्रपट 'वीडी-१२' च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. 'जर्सी' चित्रपटाचे दिग्दर्शक गौतम तिन्नानुरी या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. दरम्यान, या चित्रपटासंदर्भात एक मोठी अपडेट समोर आली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, 'वीडी-१२' च्या रिलीज डेटमध्ये बदल करण्यात आला आहे. हा चित्रपट २८ मार्च २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार होता. परंतु काही कारणास्तव याच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकळण्यात आली आहे. दरम्यान, हा चित्रपट ३० मे २०२५ या दिवशी प्रदर्शित होणार असल्याची शक्यता आहे. परंतु अद्याप चित्रपटाच्या निर्मात्यांनी याबद्दल अधिकृत घोषणा केलेली नाही. 'वीडी-१२' या चित्रपटाचे दोन भाग असणार आहेत. पण दोन्ही भागाचं कथानक पूर्णपणे वेगळं असणार आहे. दरम्यान, या चित्रपटाचं ८० टक्के शूट पूर्ण झालं आहे. या चित्रपटात विजय देवरकोंडासोबत अभिनेत्री भाग्यश्री बोरसे स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे.





# 'तनू वेड्स मनू- ३' मधून आर माधवनचा पत्ता कट?


अभिनेता आर माधवन आणि कंगना राणौत यांची मुख्य भूमिका असलेला 'तनू वेड्स मनू' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरला. 'तनू वेड्स मनु' ही बॉलिवूड सर्वाधिक लोकप्रिय असणाऱ्या फ्रँचाईजी पैकी एक आहे. चित्रपटाच्या पहिला भागाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाल्यानंतर २०१५ मध्ये 'तनू वेड्स मनू'चा सीक्वेलही आला. आता लवकरच 'तनू वेड्स मनू'चा तिसरा भागही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. परंतु नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये आर माधवन याने केलेल्या वक्तव्यामुळे चाहत्यांचे लक्ष त्याने आपल्याकडे वेधलं आहे. एका 'स्क्रीन शो'मध्ये अभिनेता आर माधवनने हजेरी लावली. यादरम्यान आर माधवनला तनू वेड्स मनू संदर्भात प्रश्न विचारण्यात आला त्यावर उत्तर देताना अभिनेता म्हणाला, मला याबद्दल कोणतीही कल्पना नाही. इन्स्टाग्रामवर सुद्धा यासंदर्भात चर्चा सुरु आहे. सोशल मीडियावर मला लोक प्रश्न विचारत आहेत. पण, अद्यापही मला आनंद एल राय किंवा इतर कोणीही 'तनू वेड्स मनू' च्या तिसऱ्या पार्ट संदर्भात विचारणा केलेली नाही. पुढे अभिनेता म्हणाला, मला काहीच माहिती नाही शिवाय स्क्रीप्ट सुद्धा मला दिलेली नाही. कदाचित मला रिप्लेस करण्यात आलं असेल.



# समांथा रुथ प्रभूची तमीळ चित्रपटांकडे पाठ?

दमदार भूमिकेतून आपला ठसा उमटवणाऱ्या साऊथ चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक समांथा रुथ प्रभूने आपल्या १४ वर्षांच्या कारकिर्दीत ५० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले, त्यापैकी काही हिट होते. तिने त्यांच्या कारकिर्दीत अनेक चांगल्या भूमिका केल्या आहेत. अलिकडेच तिने एका मुलाखतीदरम्यान खुलासा केला की, तिला आता अशा चित्रपटांचा भाग बनायचे नाही. ज्यात तिच्याकडून काही विशेष घडण्याची अपेक्षा नाही. नुकत्याच झालेल्या मुलाखतीत तिने तमीळ चित्रपटांपासून का दुरावली, यामागचे कारण सांगितले. तसेच राज आणि डीके यांच्यासोबत काम करतानाचा अनुभवही तिने मनमोकळेपणाने सांगितला. जेव्हा समांथाला विचारण्यात आले की, ती आणखी तमीळ चित्रपट का साइन करत नाहीये? कारण ती शेवटची २०२२ मध्ये रिलीज झालेल्या तमीळ चित्रपट 'काथुवाकुला रेंदू कादल'मध्ये दिसली होती. तर या प्रश्नावर ती स्पष्टपणे म्हणाली की, 'अनेक चित्रपट करणे सोपे आहे, पण आता मी अशा टप्प्यात आहे की, प्रत्येक चित्रपट माझ्यासाठी शेवटचा वाटला पाहिजे. जर माझा एखाद्या प्रकल्पावर पूर्ण विश्वास नसेल तर मी तो करू शकत नाही. राज आणि डीकेसोबत 'रक्त ब्रह्मांड'मध्ये पुन्हा काम करण्याबद्दल सांगताना समंथा म्हणाली, मला 'फॅमिली मॅन २' मध्ये काहीतरी नवीन करण्याची संधी मिळाली. मग 'सिटाडेल: हनी बनी'मध्ये काहीतरी वेगळं पाहायला मिळालं आणि 'रक्त ब्रह्मांड'मध्येही काहीतरी वेगळं करण्याची संधी मिळाली. राज आणि डीके यांनी मला अशा आव्हानात्मक भूमिकांचे व्यसन लावले आहे, ज्यामुळे मला एक कलाकार म्हणून दररोज समाधान मिळते. मला तसे वाटत नसेल तर मला काम करायचे नाही. समांथा पुढे म्हणाली की, तिला यापुढे तिच्या निर्णयांनी कोणालाही निराश करायचे नाही. सामंथाने तिच्या वैयक्तिक आयुष्यात खूप कठीण प्रसंगांचा सामना केला आहे. २०२१ मध्ये नागा चैतन्यपासून घटस्फोट घेतल्यानंतर आणि २०२२ मध्ये मायोसिटिस सारख्या आजाराचे निदान झाल्यानंतर तिने स्वतःला कामापासून दूर केले. २०२३ मध्ये तिने 'शकुंतलम' आणि 'खुशी' सारख्या तेलगू चित्रपटांमध्ये काम केले. यानंतर ती २०२४ मध्ये 'सिटाडेल: हनी बनी'मध्ये दिसली होती आणि आता ती 'रक्त ब्रह्मांड'मध्ये दिसणार आहे.

# रवींद्र महाजनींकडून गश्मीर शिकला 'ही' गोष्ट



अभिनेता गश्मीर महाजनी गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या चर्चेत आहे. 'फुलवंती' चित्रपटातील अभिनेत्याचे काम आणि 'एक राधा एक मीरा' हा आगामी काळात प्रदर्शित होणारा चित्रपट यांमुळे गश्मीर महाजनी सातत्याने चर्चेत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्याबरोबरच विविध मुलाखतींमध्ये गश्मीरने त्यांच्या व्यावसायिक, तसेच खासगी आयुष्याबाबत केलेली वक्तव्येदेखील लक्ष वेधून घेतात. चित्रपटांकडे त्याचा बघण्याचा दृष्टिकोन, अनुभव यांबद्दल त्याने मुलाखतींमधून वक्तव्य केले आहे. आता अभिनेत्याने एका मुलाखतीत तो त्याच्या वडिलांकडून काय शिकला, याबद्दल भाष्य केले आहे. गश्मीरने नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत अभिनेत्याने म्हटले, मी आयुष्यात वडिलांकडून एक गोष्टी शिकलोय ती म्हणजे परिश्रमाला पर्याय नाही. अथक परिश्रम कशाला म्हणतात, हे माझ्या वडिलांकडे बघून शिकलो आहे. २४- २४ तास न थकता, काम करताना मी त्या माणसाला पाहिलं आहे. मीसुद्धा ही गोष्ट पाळतो. मी खूप थकलोय, आता मला आराम हवाय, हे माझ्याकडून बोललंच जात नाही. मला वाटतं ते आनुवांशिकपणेसुद्धा आलंय आणि बघून- बघून त्या संस्कारातूनसुद्धा आलं आहे. याच मुलाखतीत अभिनेत्याने वडिलांबरोबर चित्रपटात काम करण्याचा अनुभवसुद्धा सांगितला. त्याबरोबरच आईविषयी बोलताना प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात आई ही सर्वांत महत्त्वाची व्यक्ती असल्याचे म्हटले. यावेळी त्याने त्याची पत्नी व मुलाच्या बॉण्डिंगबद्दलही वक्तव्य केले. गश्मीर महाजनी हा लोकप्रिय मराठी अभिनेते व दिग्दर्शक रवींद्र महाजनी यांचा मुलगा आहे. रवींद्र महाजनी हे 'मुंबईचा फौजदार', 'झुंज', 'गोंधळात गोंधळ', 'देवता', 'हळदी कुंकू', 'कशाला उद्याची बात', 'कळत-नकळत', 'देवघर', अशा अनेक लोकप्रिय चित्रपटांसाठी ओळखले जातात. २०२३ ला त्यांचे निधन झाले. दरम्यान, गश्मीर महाजनी नुकताच फुलवंती या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटात त्याने साकारलेल्या भूमिकेचे मोठे कौतुक झाल्याचे पाहायला मिळाले. या चित्रपटात प्राजक्ता माळी प्रमुख भूमिकेत दिसली होती. आता अभिनेता लवकरच एक राधा एक मीरा या चित्रपटात एक नवीन भूमिका साकारत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अभिनेत्री मृण्मयी देशपांडे व सुरभी भोसले प्रमुख भूमिकांत दिसणार आहेत. आता हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस पडणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# 'छावा'मध्ये झळकणार 'हा' मराठमोळा अभिनेता



विकी कौशलची प्रमुख भूमिका असलेला 'छावा' चित्रपट सध्या चांगलाच चर्चेत आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास मोठ्या पडद्यावर मांडण्यात येणार आहे. नुकताच मोठ्या दिमाखात या सिनेमाचा ट्रेलर लॉन्च सोहळा पार पडला. सिनेमाच्या ट्रेलरने प्रत्येकाचं मन जिंकून घेतलं आहे. या सिनेमात विकी कौशलसह अनेक मराठी कलाकार झळकणार आहेत. अभिनेता सुव्रत जोशी यामध्ये महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. 'छावा'बद्दल बोलताना सुव्रत सांगतो, एकतर छत्रपती संभाजी महाराज यांच कार्य जगभरात माहिती व्हायला हवं आणि दुर्दैवाने त्यांचा इतिहास हा लोकांना फारसा माहीत नाही. यामुळेच महाराजांच्या कार्याची महती प्रेक्षकांना समजावी म्हणून दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी यावर चित्रपट करायचा ठरवला आणि मी या चित्रपटाचा एक भाग आहे ही गोष्ट माझ्यासाठी खूप जास्त आनंद देणारी आहे. सुव्रत पुढे विकी कौशलबरोबर काम करण्याचा अनुभव सांगताना म्हणतो, विकी कौशल हा कमालीचा अभिनेता आहे. सेटवर प्रचंड मेहनत करून त्याने ही भूमिका साकारली आहे. या चित्रपटात त्याच्या सोबतीने काम करुन एक अभिनेता म्हणून अनेक गोष्टी त्याच्याकडून शिकलो. चित्रपट करताना प्रत्येक सीन करण्यासाठी आम्ही सगळेच रिहर्सल करायचो आणि प्रत्येक कलाकार आपल्या सहकलाकाराच्या रिहर्सल सीनसाठी क्यू द्यायला उभा राहायचा. मेकअप, कॉस्च्यूम, आर्ट सगळ्या टीमने अहोरात्र मेहनत करून चित्रपट तयार केला आहे. रायगडाचा सेट मांडला तेव्हा सेटवर फक्त ऐतिहासिक वेशभूषेतील कलाकार सेटवर होते. तेव्हा असं वाटलं की आपण खरोखर हा काळ जगतोय. भर उन्हात कशाचीही पर्वा न करता चित्रपटातील प्रत्येक कलाकाराने खूप उत्तम काम केलं आणि फक्त भारतात नाही तर जगभरात हा चित्रपट पोहोचावा ही माझी इच्छा आहे. दरम्यान, १४ फेब्रुवारीला 'छावा' चित्रपट प्रदर्शित होणार आहे. यामध्ये विकी कौशल, रश्मिका मंदाना आणि अक्षय खन्ना यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. आता सुव्रत 'छावा' सिनेमात काय भूमिका साकारणार हे पाहणं उत्कंठावर्धक ठरणार आहे. याशिवाय सध्या सुव्रत 'वरवरचे वधू वर' या नाटकात देखील भूमिका साकारत आहे.

# क्रिकेटरच्या मराठमोळ्या पत्नीचे सिनेविश्वात कमबॅक



बॉलिवूड अभिनेत्री सागरिका घाटगे लवकरच मोठ्या पडद्यावर कमबॅक करणार आहे. राज घराण्यातील अभिनेत्री सागरिकाने भारतीय क्रिकेटपटूसोबत लग्न केलं होतं. पण ५ वर्षांच्या ब्रेकनंतर आता ती पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या आगामी चित्रपटाचे नाव 'ललाट' असे आहे. नुकतेच तिने शूटिंग सेटवरील काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहे. यात तिचा पूर्णपणे लुक बदलण्यात आला आहे. ज्यात तिला ओळखणेही कठीण झाले आहे. मीडिया रिपोर्टनुसार, तिच्या पात्राचे नाव भगवती असे असून यामध्ये ती एका गावातील मुलीच्या भूमिकेत दिसते आहे. या भूमिकेविषयी पोस्ट शेअर करत तिने लिहिले की, 'माझा नवा चित्रपट 'ललाट'चा लूक प्रदर्शित होताना मला चिंता आणि उत्साह दोन्ही एकत्रितपणे जाणवते आहे. काही काळासाठी दूर राहिल्यानंतर हा एक आव्हानात्मक पण समाधानकारक प्रवास आहे. मला जे आवडते ते पुन्हा करणे सोपे नव्हते, परंतु मी अशा पात्रासह पुनरागमन करतेय, याबद्दल मी खूप आभारी आहे. यापूर्वी केलेल्या कोणत्याही पात्रापेक्षा हे खूप वेगळे आहे'. सागरिका पुढे लिहिते की, 'या पटकथेने, पात्रानेच मला चित्रपट जगतात परत आणले, जे मला आवडते आणि मी गमावले होते. प्रत्येक क्षण खूप खास होता आणि मला आशा आहे की मी हे करत राहीन आणि हृदयाला स्पर्श करणाऱ्या कथांचा मी एक भाग बनेन'.' सागरिकाच्या या पोस्टनंतर तिला चाहत्यांसह कलाकारांनी आगामी चित्रपटासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सागरिका ही भारताचा माजी स्टार क्रिकेटपटू झहीर खानची पत्नी आहे. सागरिका गेल्या काही काळापासून सिनेविश्वापासून दूर आहे. २०२० मध्ये ती शेवटचे 'फूटफेरी' या टेलिव्हिजन फिल्ममध्ये दिसली होती. सागरिकाचे 'चक दे इंडिया', 'फॅशन', 'शादी के बाद', आणि 'गोलमाल' हे चित्रपट विशेष गाजले. मराठीमध्ये तिने 'प्रेमाची गोष्ट' या चित्रपटात काम केले आहे. आता जवळपास पाच वर्षांनी सागरिका मोठ्या पडद्यावर अभिनय करताना दिसणार आहे.

# रणबीर कपूर 'धूम ४'मध्ये खलनायक तर...

'धूम ४' सिनेमाची सध्या खूप चर्चा आहे. आधीच्या तीन यशस्वी भागांप्रमाणे 'धूम ४' सुद्धा सुपरहिट होईल याची खात्री प्रेक्षकांना आहे. 'धूम ४' सिनेमात रणबीर कपूर मुख्य खलनायक साकारणार असल्याच्या बातमीवर जवळजवळ शिक्कामोर्तब झालंय. 'धूम ४'मध्ये आधीच्या तिन्ही पार्टप्रमाणे पोलिसांच्या भूमिकेत अभिषेक बच्चन आणि उदय चोप्रा दिसणार नाहीत असं बोललं जातंय. 'धूम ४'मध्ये कोणते कलाकार दिसणार, याच्या कास्टिंगबद्दल खुलासा झालाय. मीडिया रिपोर्टसनुसार, अभिषेक बच्चनच्या ऐवजी 'धूम ४'मध्ये विकी कौशल झळकणार आहे.

विक्की एसीपी जय दीक्षितची भूमिका साकारणार आहे. अर्थात याविषयी अधिकृत घोषणा अजून झाली नाहीये. याशिवाय उदय चोप्रा सुद्धा अलीच्या दिसणार नसल्याचं सांगितलं जातंय. उदय चोप्राच्या भूमिकेत कोण दिसणार याविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. दरम्यान, विकी आणि रणबीर सध्या 'लव्ह अँड वॉर'मध्ये एकत्र काम करत आहेत. यशराज फिल्मसची निर्मिती असलेला 'धूम ४' सिनेमा सध्या प्राथमिक स्तरावर आहे. सध्या या सिनेमात कोणते कलाकार झळकणार याविषयी बोलणी सुरु आहेत. या सिनेमाचं दिग्दर्शन कोण करणार, याविषयीही अद्याप नाव निश्चित नाही. 'धूम ४'चं प्री प्रॉडक्शनचं काम अंतिम टप्प्यावर आलं आहे. ते झालं की यावर्षी शूटिंगला सुरुवात होऊन पुढील वर्षी २०२६ साली 'धूम ४' सिनेमा रिलीज होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आधीच्या तीन भागात जॉन अब्राहम, हृतिक रोशन, आमिर खान या तीन कलाकारांनी खलनायकाची भूमिका साकारली.





## यामी गौतमच्या धूम धाम लवकरच होतोय प्रदर्शित

'धूम धाम' हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात प्रतीक गांधीसोबत यामी गौतम दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन ऋषभ सेठ यांनी केले आहे. या चित्रपटाची निर्मिती आदित्य धर आणि लोकेश धर यांनी केली आहे. हा चित्रपट १४ फेब्रुवारी रोजी म्हणजेच व्हॅलेंटाईन डे रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात यामी आणि प्रतीक गांधी ही जोडी दिसणार आहे. ही कोयल आणि वीरची कहाणी आहे. वीर हा आईचा मुलगा आहे जो प्राण्यांचा डॉक्टर देखील आहे. तर यामी गौतमचे पात्र कोयल ही एक चुलबुली मुलगी आहे. या चित्रपटाचा टीझर नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाबाबत आदित्य म्हणाले की, त्यांना काहीतरी वेगळे आणि मनोरंजक बनवायचे होते. जिथे हास्य, कृती आणि रोमान्स आहे. या चित्रपटात चाहत्यांना यामी आणि प्रतीकची जोडी पाहायला मिळणार आहे. यामी आणि प्रतीक यांचा 'धूम धाम' हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. मूळ चित्रपटाच्या दिग्दर्शिका रुचिका कपूर म्हणाल्या, धूम धाम हा एक विनोदी नाटक चित्रपट आहे जो लग्नाच्या दिवशी काहीतरी वेगळेपणा आणतो. या चित्रपटाच्या माध्यमातून आम्ही आमच्या प्रेक्षकांचे मनोरंजन करू शकू. पोस्टर शेअर करताना नेटफ्लिक्सने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'आम्हाला नात्यासाठी डीएम करू नका, कारण आमचे लग्न 'धोम धाम' सोबत होणार आहे. पोस्टरमध्ये यामीचा फोटो आहे, ज्यामध्ये ती डोक्यावर चुनरी घालून पारंपारिक लूकमध्ये दिसत आहे.

# तब्बूच्या झोळीत आणखी एक हॉरर चित्रपट

अभिनेत्री तब्बूने अनेक दमदार भूमिका साकारून प्रेक्षकांच्या मनात एक खास स्थान निर्माण केले आहे. रोमान्स, थ्रिलर आणि ॲक्शन व्यतिरिक्त, तब्बूने हॉरर-कॉमेडी चित्रपटांद्वारेही प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. 'हवा', 'गोलमाल अगेन', 'भूल भुलैया २' नंतर, तब्बू आता आणखी एका हॉरर चित्रपटात दिसणार आहे. तब्बूने अलीकडेच तिच्या इंस्टाग्राम पोस्टद्वारे खुलासा केला की ती दिग्दर्शक प्रियदर्शनच्या आगामी 'भूत बांगला' चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाच्या पोस्टसोबत, तीने क्लॅप बोर्डचा फोटो शेअर केला आणि लिहिले, 'आपण इथे बंद आहोत.' या चित्रपटात तब्बू व्यतिरिक्त अक्षय कुमार देखील दिसणार आहे. तब्बूचा हा चित्रपट पाहण्यासाठी तुम्हाला २०२६ पर्यंत वाट पहावी लागेल. २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'भूल भुलैया २' या चित्रपटात तब्बूने दुहेरी भूमिका साकारली होती. या हॉरर कॉमेडी चित्रपटात तब्बूने मंजुलिका आणि अंजुलिका यांची भूमिका साकारून सर्वांना आश्चर्यचकित केले. या चित्रपटात तब्बू जितकी सुंदर दिसत होती तितकीच तिने मंजुलिकाच्या भूमिकेने सर्वांना घाबरवले होते. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी झाला आणि त्यात कार्तिक आर्यन आणि कियारा अडवाणी यांनीही महत्त्वाच्या भूमिका साकारल्या. 'गोलमाल अगेन' मध्ये परिणीती चोप्राने एका आत्म्याची भूमिका साकारली आहे आणि तब्बूमध्ये एक अशी शक्ती आहे ज्याद्वारे ती केवळ भूतांना पाहू शकत नाही तर त्यांच्याशी बोलू शकते. या चित्रपटात भयपटांसोबतच जबरदस्त कॉमेडीही पाहायला मिळाली. या चित्रपटात तब्बू व्यतिरिक्त अजय देवगण, श्रेयस तळपदे, तुषार कपूर आणि अर्शद वारसी यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. २०१७ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन रोहित शेट्टी यांनी केले होते. २००३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'हवा' या हॉरर चित्रपटात तब्बूने मुख्य भूमिका साकारली होती. हा चित्रपट गुड्डू धनोआ यांनी दिग्दर्शित केला होता. चित्रपटात, घटस्फोटानंतर संजना (तब्बू) तिच्या मुली आणि भावासोबत जंगलातील एका झोपडीत राहते, जिथे तिला तिच्याभोवती अलौकिक कारवायांचा सामना करावा लागतो आणि तिला गुन्हेगारांच्या आत्म्यांशी सामना करावा लागतो.



# चित्रपटाची स्क्रीप्ट १४ दिवसांत लिहिलेली



चित्रपट बनवत असताना आपण आपली आवड जोपासत व्यावसायिक गोष्टींकडे जागरूकपणे पाहणे आवश्यक असल्याचे वक्तव्य दिग्दर्शिका फराह खानने केले. जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठी रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दिग्दर्शक फराह खान यांनी मास्टरक्लासमध्ये उपस्थितांशी संवाद साधला. दिग्दर्शक जयप्रद देसाई यांनी या मास्टरक्लासचे संचालन केले. पुढे बोलताना फराह खान म्हणाली, गाण्यातून चित्रपटाची कथा पुढे जाणे गरजेचे आहे. आयटम सॉंगपेक्षा अशी गाणी करणे मला जास्त आवडेल. एक कोरिओग्राफर आणि दिग्दर्शक म्हणून मला ही माझी ताकद वाटते. स्वप्न पाहिली तरच ती पूर्ण करण्याची ताकद तुमच्यात येत असते. कोरिओग्राफी आणि डायरेक्टर या दोन्ही जबाबदार्‍या माझ्यासाठी लर्निंग प्रोसेस होती. कोरिओग्राफर म्हणून काम करत असले तरी दिग्दर्शक म्हणूनच काम करायचे हे पक्के ठरवले होते. त्यामुळे ओम शांती ओम सारखा चित्रपट केवळ १४ दिवसात लिहून पूर्ण झाला. आपली आवड आणि व्यवसायाची सांगड घालता आली तर नक्कीच उत्तम निर्मिती होते. माझ्यासाठी हीच बाब कायम महत्वाची आहे, असे फराह खान म्हणाली. पुढे बोलताना फराह खान म्हणाली, इतरांसारखे वागण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा स्वतःचे वेगळेपण जपत कार्यरत राहणे गरजेचे आहे. तुम्ही जे स्वप्न पाहता ते ही सत्यात उतरवविण्यासाठी प्रचंड मेहनत काम करा. आपल्या आयुष्यात असणाऱ्या अडचणी संदर्भात स्वतः कारणे देण्यापेक्षा काम करत राहिले पाहिजे. या जगात अशक्य असे काहीच नाही, केवळ आपण विश्वास ठेवत मेहनत करणे आवश्यक आहे. 'कभी हा कभी ना' चित्रपट माझ्यासाठी जसा कोरिओग्राफर म्हणून महत्वाचा ठरला तसाच 'ओम शांती ओम' दिग्दर्शक म्हणून महत्वाचा आहे. चार चित्रपटाची निर्मिती केली. त्यातील एकाला अपयश आले, मात्र अपयशाच्या कारणांचे विश्लेषण करून पुन्हा नव्याने कामाला लागले तरच आपण पुढे जाऊ शकतो असा विश्वास तिने चित्रपटनिर्मिती क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांना दिला. फराह खानने अतिशय खुमासदार शैलीत उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

# नव्या दमाचा चित्रपट घेऊन तापसी येतेय!



बॉलीवूडमध्ये असेही काही कलाकार आहेत की, जे त्यांच्या वेगळ्या धाटणीच्या चित्रपटांसाठी ओळखले जातात. या कलाकारांमध्ये तापसी पन्नूचे नाव घेतले जाते. तापसीने स्वबळावर आपले सिनेमे यशस्वी करून दाखवले आहेत. अलिकडेट ओटीटीवर रिलीज झालेल्या तिच्या 'हसीन दिलरुबा' आणि 'फिर आई हसीन दिलरुबा'ला प्रेक्षकांनी अक्षरश: डोक्यावर घेतलं. हिच प्रेक्षकांची लाडकी दिलरुबा आता 'गांधारी' बनली आहे.

तापसी पन्नू नव्या वर्षात नव्या दमाचा चित्रपट घेऊन येतेय. कनिका धिल्लन लिखित आणि निर्मित या चित्रपटातील 'गांधारी' महाभारत काळातील नाही, तर आधुनिक काळातील आहे. या ॲक्शन थ्रिलरपटात थरारक सूडकथा पाहायला मिळणार आहे. तापसीचा हा चित्रपटही ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर रिलीज होणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने तापसी आणि इश्वाक प्रथमच एकत्र काम करत आहेत. अलिकडेच तापसीनं इन्स्टाग्रामवर गांधारीच्या सेटवरील काही फोटो शेअर केले होते. या फोटोंमध्ये तापसी कॅमेऱ्याकडे पाठ करून दिसत आहे. कॅप्शनमध्ये तिनं लिहलं, हे देवा... माझी विनंती मान्य कर... जेणेकरून मी कधीही चांगले काम करण्यापासून विचलित होणार नाही. मी युद्धात जाताना शत्रूची भीती बाळगणार नाही. दृढनिश्चयाने मी विजयी होईन. मी माझ्या मनाला फक्त तुझे गुणगान गाण्यास शिकवू शकेन आणि जेव्हा वेळ येईल तेव्हा मी युद्धाच्या मैदानावर वीरतेने लढत मरावे.

'गांधारी' या चित्रपटाच्या माध्यमातून तापसी आणि कनिका ढिल्लन पुन्हा एकदा एकत्र येत आहेत. याआधी तापसी आणि कनिका यांनी रश्मी रॉकेट, मनमर्जियां, हसीन दिलरुबा आणि नंतर हसीन दिलरुबामध्ये एकत्र काम केलं होतं. गांधारी हा त्यांचा एकत्र पाचवा चित्रपट असेल.

# 'आशिकी ३' मधून तृप्तीचा पत्ता कट?

तृप्ती डिमरी तिच्या 'भूल भुलैया ३' मधील सहकलाकार कार्तिक आर्यनबरोबर 'आशिकी ३' मध्ये पुन्हा झळकणार होती. गेल्या वर्षी याची घोषणा करण्यात आली होती, आणि मिळालेल्या माहितीनुसार, या दोघांनी मुहूर्त शॉटही दिला होता. मात्र, तृप्ती या चित्रपटाचा भाग नसेल अशा चर्चा आहेत. तृप्ती या रोमँटिक चित्रपटासाठी खूप उत्सुक होती, पण आता हे घडणार नाही.

'आशिकी ३'च्या टायटल संबंधित काही वाद चालू आहे. त्यामुळे हा सिनेमा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आला आहे, असे एका सूत्राने सांगितले. शूटिंगला उशीर झाल्यामुळे तृप्तीने चित्रपट स्वतःहून सोडला असे सांगितले जात असले तरी 'आशिकी ३'च्या निर्मात्यांनी तृप्तीला चित्रपटातून हटवण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जाते. या चित्रपटासाठी नायिकेमध्ये निरागसता दिसणे आवश्यक आहे असे वाटत आहे. पण तृप्तीच्या अलीकडच्या चित्रपटांमुळे तिची प्रतिमा बदलली आहे. यामुळे ती भूमिकेसाठी योग्य वाटत नाही. तृप्तीच्या प्रतिमेत 'ॲनिमल'नंतर बदल झाल्यामुळे निर्मात्यांना ती या भूमिकेसाठी योग्य वाटत नाही, असेही सूत्राने सांगितले. आशिकी हा एक प्रेमकथानक असलेला चित्रपट आहे. निर्मात्यांना तृप्ती ही त्या पात्रासाठी योग्य वाटत नाही. शिवाय, तिच्या अलीकडच्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर फारसा चांगला परफॉर्मन्स दिला नाही.



# रवीनाच्या लेकीची बॉलिवूडमध्ये एन्ट्री

अभिनेत्री रवीना टंडनने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. आपल्या अभिनयाने आणि सौंदर्याने तिने सर्वांना घायाळ केले आहे. आता रवीनाच्या लेकीने देखील बॉलीवूडमध्ये करियर करण्याचा निर्णय घेतला आहे. रवीना टंडनची मुलगी राशा थडानीने वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी बॉलीवूडमध्ये पदार्पण केले आहे.

'आझाद' या चित्रपटातून राशाने बॉलिवूड इंडस्ट्रीत धमाकेदार एन्ट्री केली आहे. 'आझाद' चित्रपटातील राशाचं पहिलं आयटम साँग प्रेक्षकांना खूप आवडले. 'ऊई अम्मा' असं या गाण्याचं नाव असून प्रदर्शित या गाण्याने सोशल मिडियावर धुमाकूळ घातला. या गाण्यातील तिचा अप्रतिम डान्स आणि चेहऱ्यावरील हावभाव पाहून नेटकरी तिचं भरभरून कौतुक करत आहेत. मधुबंती बागची यांचा आवाज आणि अमिताभ भट्टाचार्य यांच्या संगीताने हा ट्रॅक अमित त्रिवेदी यांनी संगीतबद्ध केला आहे. बॉस्को लेस्ली मार्टिसने कोरिओग्राफ केलेले 'उई अम्मा' हे गाणे हिट ठरत आहे. दरम्यान, राशाचा 'आझाद' हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटातून राशासोबतच अभिनेता अजय देवगणचा भाचा अमन देवगणसुद्धा बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. यामध्ये अजय देवगणची मुख्य भूमिका आहे. हा चित्रपट स्वातंत्र्यपूर्व भारताची कहाणी दाखवतो. हा चित्रपट एका कुशल घोडेस्वाराची (अजय देवगण) कथा सांगतो जो क्रूर इंग्रजी सैन्याच्या तावडीतून सुटतो. त्याचा घोडा बेपत्ता होतो आणि त्यानंतर तो एका लहान मुलाच्या मदतीने मिशनवर जातो.



# मी इथे मित्र बनवायला नव्हे तर ...

कार्तिक आर्यन हा बॉलिवूडमधील आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक आहे. अभिनयाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना सुद्धा अभिनेत्याने इंडस्ट्रीत स्वतः चं हक्काचं स्थान निर्माण केलं आहे. कार्तिक आर्यननेबॉलिवूड इंडस्ट्रीला बरेच सुपरहिट सिनेमे दिले आहेत. 'प्यार का पंचनामा','भूल भुलैया २', 'भूल भुलैया ३', 'सत्यप्रेम की कथा' यांसारख्या चित्रपटांमध्ये त्याने काम केलं आहे. कार्तिक आर्यन सध्या त्याच्या आगामी प्रोजेक्टमुळे चर्चेत आहे. 'आशिकी-३' चित्रपटात तो लवकरच झळणार आहे. दरम्यान, नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये अभिनेत्याने इंडस्ट्रीतील मैत्रीबद्दल खुलासा केला आहे. नुकतीच कार्तिकने एका इव्हेंटला हजेरी लावली. त्यादरम्यान अभिनेता म्हणाला, मुळात मी फार बोलत नाही. शिवाय मी ज्यांना ओळखतच नाही त्यांच्यासोबत जास्त बोलणंच होत नाही. कारण मी इथे मित्र बनवायला नाही तर काम करण्यासाठी आलो आहे. दर शुक्रवारनंतर माझे मित्र बदलतात.

या शोमध्ये कार्तिक आर्यनने तो अनुराग बासू यांच्यासोबत लवकरच एका प्रोजेक्टमध्ये काम करणार असल्याची माहिती दिली आहे. त्यावेळी कार्तिक म्हणाला, ती एक रोमँटिक फिल्म आहे. आता माझा जो लूक आहे असाच लूक त्या चित्रपटामध्ये असणार आहे. या चित्रपटाचं शूट केव्हा सुरु होईल याची मी वाट बघतो आहे.

